# यशोदा टेक्निकल कॅम्पसमध्ये सायबर सुरक्षा प्रशिक्षण

प्रतिनिधी
सातारा

यशोदा टेक्निकल कॅम्पस, सातारा येथे क्विक हिल फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा २०२४-२५' या अभियानासाठी निवड करण्यात आलेल्या महाविद्यालयाचे क्लब ऑफिसर्स, विद्यार्थी प्रतिनिधी, शिक्षक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत सायबर वॉरिअर्स यांना प्रशिक्षण देण्यात आले.

दरम्यान उपस्थितांना प्रशिक्षण देताना सी.एस.आर. क्विक हिल फाउंडेशनच्या एक्झीक्युटिव्ह गायत्री केसकर देश सेवा यांचा विचार मनात तेवत ठेवत स्वत:मधील बदलाने सुरुवात करत समाजव्यापी काम आपल्या सर्वांना एकत्रित मिळून करायचे असल्याचे सांगितले. तसेच आज आपण डिजिटल युगात आहोत असे म्हटले जाते. लोकांची ऑनलाईन फसवणूक करून पैसे कमवणाऱ्या विविध टोळ्या भारतभर सक्रिय आहेत. त्यांच्यामार्फत देशभरातील लोकांना बनावट कॉल करून, मेसेज करून त्यांची फसवणूक केली जाते. काहीवेळा बनावट ऑनलाईन शॉपिंग साईट्स बनवून लोकांचे पैसे लुटले जातात. ऑनलाईन फसवणुकीचे नवनवीन प्रकार या टोळ्या आत्मसात करत असतात, अगदी सहजपणे लोकांना या टोळ्या त्यांच्या विळख्यात अडकवतात.

ओटीपीची मागणी करून, बँक डिटेल्स मागून खात्यातले सर्व पैसे गायब करण्याचे काम या लुटारू टोळ्या करत असतात. चांगला जॉब लावून देऊ, परदेसल्या कामाची संधी प्राप्त करून देऊ असे सांगत



सातारा : सायबर सुरक्षा अभियान प्रशिक्षण प्रसंगी गायत्री केसकर व विद्यार्थी.

लोकांना अगदी सहजपणे फसवले जाते. हे सर्व काम करत असताना या टोळ्या अधिक खबरदारी घेतात आणि त्यामुळेच आर्थिक फसवणूक झाल्यानंतर तुम्ही पोलिसात गेलात, तरी पोलीस देखील आरोपींना पकडण्यात अपयशस्वी ठरतात. त्यामुळे, अशा प्रकारांना बळी न पडण्यासाठी नेहमी खबरदारी घेणे आवश्यक आहे.

फसवणूक करण्याच्या विविध पद्धती असून बँकेतून बोलत असल्याचं भासवून ओटीपीची मागणी बऱ्याचदा आपल्या फोनवर बँकेतून कॉल येतात. बऱ्याचदा या कॉलमागे ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या टोळ्याच असतात. बँकेतून बोलत असल्याचे भासवून आणि बँकेसारखे खोटे मेसेज पाठवून ही टोळी ग्राहकांकडे ओटीपी मागते. ओटीपी प्राप्त करून ग्राहकांच्या बँक अकाउंटमधील पैसे लुटले जातात.

सायबर गुन्ह्यांची वाढती संख्या लक्षात घेता सायबर सुरक्षा अभियानाचे विशेष महत्व आहे. लोकांमध्ये जनजागृतीच्या माध्यमातु अशा प्रकारच्या सायबर गुन्ह्यांना आळा घालता येईल.

या अभियानासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष प्रा. दशरथ सगरे, उपाध्यक्ष प्रा. अजिंक्य सगरे, डायरेक्टर डॉ विवेककुमार रेदासानी, प्राचार्य डॉ विक्रम पाटील, असोसिएट डायरेक्ट प्रा. रणधीरसिंह मोहिते, रजिस्ट्रार गणेश सुरवसे आदींनी अभिनंदन केले.

कार्यक्रमात महाविद्यालयातील स क्लब ऑफिसर्स, संगणक विभागाचे विभाग प्रमुख डॉ .सरिता बलशेठवा संगणकशास्त्र विभागातील सायबर सुरक्षा प्रोग्राममधे समन्वयक प्रा विकास कव्हाण आदींसह प्रशिक्षणार्थ उपस्थित होते.